डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

तरुण भारत
सातारा
www.tarunbharat.com
₹ ४.०० शनिवार दि. १ ऑक्टोबर २०१६ बेळगाव ● गोवा
सातारा पान ७

# कोरेगावात आज रंगणार कलागुणांचा युवा महोत्सव

## यजमान डी. पी. भोसले कॉलेज सज्ज, पतंगराव कदम यांच्या हस्ते होणार उद्घाटन

वार्ताहर
कोरेगाव

एकांकिकेपासून लोकनृत्यापर्यंत आणि समूहगानापासून पथनाट्यापर्यंत अशा विविध गुणांचा युवा महोत्सव कोरेगावात रंगणार आहे. शिवाजी विद्यापीठाचा ३६व्या सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव शनिवारपासून कोरेगाव येथे होत असून यजमान डी. पी. भोसले महाविद्यालयाने महोत्सवाची जय्यत तयारी केली आहे.

३६ व्या सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उद्घाटन माजी मंत्री, आमदार पतंगराव कदम यांचे हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ विकास मंडळाचे प्रमुख डॉ. डी. आर. मोरे तर अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील आहेत. सचिव डॉ. गणेश ठाकूर, प्राचार्य डॉ. विजससिंह सावंत यांची प्रमुख उपस्थिती आहे.

महोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. चार रंगमंच उभारण्यात आले आहेत. मुख्य कलाविष्कार कर्मवीर रंगमंचावर होणार आहेत. याशिवाय डी. पी. भोसले रंगमंच, इनडोअर स्टेडियम अशा चार रंगमंचावरही कलाविष्कार सादर होणार आहेत. यंदा ७५ महाविद्यालयांचे संघ दाखल होणार असून सुमारे दोन हजार युवा कलाकार एकांकिका, लोकनृत्य, लघुनाटिका, पथनाट्य, मूकनाट्य, समूहगीत, वक्तृत्व अशा विविध १३ कलाप्रकारात सहभागी होऊन महोत्सवात रंगत आणतील.

दरम्यान, डी. पी. भोसले महाविद्यालयाची जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या आयोजनाची ही पहिलीच वेळ आहे. त्यामुळे युवा महोत्सव यशस्वी करण्यासाठी जोरदार तयारी केली आहे. महोत्सव सज्जतेसाठी विविध कमिट्या तयार केल्या असून, स्वयंसेवक नेमले आहेत. याद्वारे नियोजन नेटके करण्यावर भर आहे. याशिवाय महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य शामियाना उभारला असून अत्याधुनिक ध्वनीप्रक्षेपण यंत्रणा उभारली आहे. स्वागत कमानी उभारून महाविद्यालयाचा परिसर सुशोभित केला आहे.


**कोरेगांव : रंगीत तालमीत व्यस्त कलाकार.**